MHPU240019272022

# <u>आदेश निशाणी क्रमांक ११ खाली</u>

(बबन कोकणे वि. रामदास कोकणे)

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दुरुस्ती होवून मिळणेकामी दाखल केला. वादीतर्फे विद्वान वकील श्री. बी. एस. पोखरकर यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. २ ते २० विरुध्द प्रकरण एकतर्फा चालवण्यात येत असल्यामुळे व त्यांचा पुकारा केला असता ते गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या युक्तीवादाशिवाय प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर निकाली काढण्यात येत आहे. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. वादीने सदरचा दावा सरस–निरस मानाने वाटप करुन मिळणेकामी दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक १ हे वादीचे चुलत भाउ आहेत. प्रतिवादी क्र. १ यांना बजावणीसाठी समन्स पाठविले असता सौ. शारदाबाई रामदास कोकणे यांचेकडे प्रतिवादी क्र. १ बाबत चौकशी करता त्यांनी त्यांच्या पतीचे नाव रामदास जिजाराम कोकणे असे नसुन श्री. रामदास बबन उर्फ पाटलू कोकणे असे असल्याचे सांगुन ते बाहेर गेल्याचे सांगितले. त्याबाबत निशाणी क्र. ६ वरील बेलिफ रिपोर्ट पुष्टी देतो. तसेच प्रस्तुत अर्जावर म्हणणे मागवुन देखील आजपर्यंत कोणीही म्हणणे दाखल केले नाही. विशेष म्हणजे प्रतिवादी क्र. २ ते २० यांचेविरुध्द प्रस्तुत प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश दिनांक १२.०७.२०२३ रोजी माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी पारीत केला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. १ यांच्या नावात दुरुस्ती होणे न्यायाच्या दृष्टीने क्रमप्राप्त

आहे. तसेच महत्तवाची बाब म्हणजे, प्रस्तुत दुरुस्ती क्रम ६ नियम १७ अंतर्गत सुधारणेद्वारे पटलावर येणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुप बदलणार नाही तसेच, प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींवर कोणताही अन्याय होणार नाही. सदर दुरुस्तीनंतर प्रतिवादींना त्यावर त्यांची कैफीयत देण्याचा अधिकार आहे. मागणीप्रमाणे दुरुस्ती केल्यास न्यायालयास दाव्याचा अंतिम निकाल करणेस देखील मदत होणार आहे. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता आणि तांत्रीक कारणांचा विचार करता दाव्याची गुंतागुंत वाढू नये म्हणुन अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास वादीस परवानगी देणे योग्य व न्यायोचित होणार आहे. करिता मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रु. १,०००/– सरकार जमा करावेत.

३. प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत वादीने मुळ दाव्यात प्रस्तावित दुरुस्ती करावी.

स्वाक्षरी/–
(श्रीमती एस. एन. हुरगट)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव.

दिनांक:– ११.०६.२०२४